**L. C. BILL No. IV OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२१ चे विधान परिषद विधेयक क्रमांक ४.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती

१८८८ चा ३.
१९४९ चा ५९.
१९६५ चा महा. ४०.

अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक ६ डिसेंबर २०२१ रोजी, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता;

२०२१ चा महा. अध्या. १५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ६ डिसेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५ब च्या पहिल्या परंतुकामध्ये, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या " या मजकुराऐवजी, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१८८८ चा ३.
२०१८ चा महा. २१.
२०२१ चा महा.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट-कलम (२अ) च्या पहिल्या परंतुकामध्ये, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या " या मजकुराऐवजी, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०१८ चा महा. २१.
२०२१ चा महा.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात ज्याचा निर्देश " महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५ब च्या पहिल्या परंतुकामध्ये, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या " या मजकुराऐवजी, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९४९ चा ५९.
२०१८ चा महा. २१.
२०२१ चा महा.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ ची सुधारणा.

२०१८ चा महा. २१. २०२१ चा महा.

**५.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१ब) च्या पहिल्या परंतुकामध्ये, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या " या मजकुराऐवजी, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण चार

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

१९६५ चा महा. ४०. २०१८ चा महा. २१. २०२१ चा महा.

**६.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे, या प्रकरणात ज्याचा निर्देश " नगरपरिषदा अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ९अ च्या पहिल्या परंतुकामध्ये, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या " या मजकुराऐवजी, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१-१ब ची सुधारणा.

२०१८ चा महा. २१. २०२१ चा महा.

**७.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१-१ब च्या पहिल्या परंतुकामध्ये, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या " या मजकुराऐवजी, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण पाच

## संकीर्ण

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२१ चा महा. अध्या. १५.

**८.** (१) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२१ हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेल्या कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याचे कलम ५ब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याचे कलम ५ब आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याचे कलम ९अ यांमध्ये अशी तरतूद आहे की, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) आणि त्याखाली केलेले नियम, यांच्या तरतुदींनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांतील व्यक्तींकरिता राखीव असलेल्या जागेवर निवडणूक लढवू इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत, सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी समितीने निर्गमित केलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील.

२. उक्त कलमांमध्ये सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ आणि सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५ यांद्वारे सुधारणा करण्यात आली आहे. उक्त उमेदवाराला, वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत जात पडताळणी समितीकडे त्याने दाखल केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा जात पडताळणी समितीकडे असा अर्ज केल्याबाबतचा इतर कोणत्याही पुराव्याची सत्यप्रत ; आणि जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र, त्याच्या निवडणुकीच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीच्या आत, तो सादर करील, अशा आशयाचे हमीपत्र, राखीव जागेच्या निवडणुकीसाठीच्या नामनिर्देशन पत्रांसोबत सादर करण्याची परवानगी आहे. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ द्वारे केलेल्या सुधारणेनुसार अशा तरतुदी दिनांक ३० जून २०१९ पर्यंत लागू होत्या.

३. हे वैधता प्रमाणपत्र देण्याच्या कामामुळे जात पडताळणी समितीच्या कामात प्रचंड वाढ झाली आहे आणि त्याच्या परिणामी, वैधता प्रमाणपत्र मिळविण्यात उमेदवारांना अडचणी येतात. संबंधित नगरपालिका कायद्यांच्या तरतुदी लक्षात घेता, जर निवडून आलेल्या उमेदवाराने त्याच्या निवडणुकीच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली तर त्याची निवड, भूतलक्षीप्रभावाने समाप्त होते आणि तसेच तो, ते पद धारण करण्यासाठीदेखील अपात्र ठरतो.

४. निवडून आलेल्या ज्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र यापूर्वीच प्राप्त केले आहे अशा उमेदवारांनी सादर केलेल्या हमीपत्रानुसार जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाही केवळ एवढ्याच कारणावरून सदर उमेदवार अपात्र ठरणार नाहीत, याची सुनिश्चिती करण्याकरिता अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या कालावधीपर्यंत निवडून आलेल्या उमेदवारांना असे प्रमाणपत्र सादर करण्याची मुदतवाढ देण्याकरिता तरतूद करणे इष्ट वाटले. यादृष्टीने, मुंबई महानगरपालिका अधिनियम याची कलमे ५ब व ३७, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याची कलमे ५ब व १९ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची कलमे ९अ व ५१-१ब यांमध्ये योग्य त्या सुधारणा करणे इष्ट वाटले.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक ६ डिसेंबर २०२१ रोजी, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. १५), हा प्रख्यापित केला होता.

६. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **एकनाथ शिंदे,**

दिनांक १५ डिसेंबर २०२१. नगरविकास मंत्री.

“ ”

# सन २०२१ चे वि.प.विधेयक क्रमांक.– मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२१ – याचे परिशिष्ट.

## (मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यातील उतारे)

## ( सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३)

**१.** ते **५अ.** * * * * * *

राखीव जागेकरिता निवडणूक लढविण्याऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

**५ ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रामणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल:

परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्यांच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दल हमीपत्र, सादर करील.

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेलः

परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

**६.** ते **३६ अ.**

**३७.** (१) आणि (२) * * * * * * महापौर व उप महापौर.

(२अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यांच्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रामणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल:

परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दल हमीपत्र, सादर करील:

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर राहण्यास निरर्ह ठरेल:

परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(३). ते (८) * * * * * *

**३७. १ अ.** ते **५२७ अ.** * * * * * *

**अनुसूची.** * * * * * *

## (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यातील उतारे)

## (सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९)

**१.** ते **५.** * * * * * *

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

**५ ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रामणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेलः

परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दल हमीपत्र, सादर करीलः

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेलः

परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली सहा महिन्यांची मुदत बारा महिन्यांची मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

**६.** ते **१८.**

**१९.** (१) व (१अ) * * * * * *

महापौर व उप महापौर.

(१ ब) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनिय मन) अधिनियम, २००० यांच्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रामणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेलः

परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी

पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दल हमीपत्र, सादर करील.

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर राहण्यास निरर्ह ठरेल.

परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली “सहा महिन्यांची” मुदत “बारा महिन्यांची” मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| (२) ते (६) | * * | * * | * * |
| **१९.-१ अ.** ते **४९३** | * * | * * | * * |
| **परिशिष्ट.** | * * | * * | * * |
| **अनुसूची.** | * * | * * | * * |

## (महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे)

## (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.)

**१.** ते **९.** ** ** **

**९ अ.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दल हमीपत्र, सादर करील.

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल.

परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

**१०.** ते **५१ – १अ.**

**५१ – १ ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सभापती पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यांच्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

सभापतीच्या राखीव पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र सादर करणे

परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या कालावधी दरम्यानचा

असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दल हमीपत्र, सादर करील.

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती अध्यक्ष राहण्यास निरर्ह ठरेल.

परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

**५१ अ.** ते **५१ ब.** * * * * * *

**५२.** ते **३५१.** * * * * * *

**अनुसूची.** * * * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४.]**

**[मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगरविकास मंत्री**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई